# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

**Website**: www.jdroamt.org
**Fax No**: (0721) 2577913


**अत्यंत महत्वाचे / कालमर्यादीत**

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /गुण.याद्या/२०२६/2700
दिनांक :- 01 OCT 2026

प्रति,

**प्राचार्य / संचालक,**
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / विद्यापिठ विभाग / खाजगी विनाअनुदानित
अभियांत्रिकी पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था/वास्तुशास्त्र पदवी संस्था,
तसेच एमबीए/एमसीए पदव्युत्तर पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषयः- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या सर्व पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे,प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील राज्य CET कक्षाच्या व संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या सर्व अभियांत्रिकी पदवी तसेच एम ई पदव्युत्तर पदवी / वास्तुशास्त्र पदवी तसेच एमबीए/एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यता घेणे बंधनकारक आहे. त्यानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या गुणवत्ता याद्यास या कार्यालयामार्फत पडताळणी करण्यात येणार आहे. पडताळणी करतांना सर्व साधारणपणे खालील कार्यपध्दती अवलंबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) च्या तरतुदीनुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. सर्व अभियांत्रिकी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता याद्या **सोबत जोडलेल्या आपल्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास या कार्यालयाच्या सभागृहात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून तपासून घ्याव्यात, तसेच विहीत मुदतीत पूर्ण करुन त्यानंतरच सदर गुणवत्ता याद्या दिनांक २३/१०/२०२६ पर्यंत या कार्यालयात सादर कराव्यात.** यानंतर सादर केलेल्या गुणवत्ता याद्या कोणत्याही परीस्थितीत स्विकारल्या जाणार नाही, याची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.

**सादर केलेल्या गुणवत्ता याद्या यांची संस्थेतर्फे गुणवत्ता याद्या संस्थास्तरावर समिती नेमूण प्रथम तपासणी संस्थास्तरावर झालेली असल्याबाबतचे प्राचार्याचे पत्र व संबंधित तपासणी अधिकारी यांचा अहवाल सोबत जोडणे आवश्यक आहे.**

तसेच तपासणी अधिकाऱ्यांची नियुक्ती आपल्या स्तरावर करुन, संबधीत तपासणी अधिकाऱ्यांना **Government of Maharashtra State Common Entrance Test Cell Acadamic Year 2026-27** मधील सबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची माहीती पुस्तिका मध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे तपासणी करण्याबाबत आपल्या स्तरावरुन निर्देश द्यावेत. तसेच पडताळणी करतांना खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

१) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये नव्याने सुरु झालेल्या संस्थाकडुन प्रथम वर्षाकरीता मुदतठेवीचा हप्ता मा.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई व संस्था अध्यक्ष यांचे संयुक्त ठेव खात्यात जमा केले किंवा नाही, याची पडताळणी करावी. भरलेली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर प्रवेश यादी पडताळणीची कार्यवाही करावी. मुदत ठेव पावती संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण म.रा., मुंबई यांच्या संयुक्त नावाने असल्याची खात्री करुन त्यासबंधी सबंधित बँकेचे प्रमाणपत्र संस्थेकडून उपलब्ध करुन घ्यावे. तसेच सर्वच संस्थांनी मुदतठेव ठेवल्याबाबतची तपासणी करुन गुणवत्ता यादीसोबत जोडण्यास कळवावे.

२) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये ज्या संस्थांना नविन अभ्यासक्रम/सुरू असलेल्या अभ्यासक्रमामध्ये वाढ व नविन संस्था सुरु करण्यास मंजुरी मिळालेली आहे अश्या संस्थांनी या कार्यालयाची तपासणी शुल्क भरल्याबाबत कागदपत्रे वाढिव अभ्यासक्रमाचे ठेव ठेवल्याची पावती व अंतिम मान्यता प्रमाणपत्रे इत्यादी तपासावे.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता आपल्या संस्थेतील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची तपासणी नमुद दिनांकास करण्यात यावी.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश शुल्क व विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतुदी तसेच वेळोवेळी पारीत झालेले प्रवेश नियम/शासन निर्णय/अधिसुचना/न्यायालयीन आदेश व विहीत केलेल्या नियमांनुसार प्रवेश पडताळणी अहवाल संचालनालयामार्फत सादर झाल्याशिवाय शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची अंतिम मान्यता प्रदान होणार नाही व त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्यास सर्वस्वी

जबाबदार सबंधित संस्था राहील याची नोंद घ्यावी. सोबत जोडलेल्या यादीमध्ये एखाद्या संस्थेचे नाव नजरचुकीने राहुन गेलेले असल्यास अश्या संस्थेनी या कार्यालयाशी संपर्क साधावा.

१) प्रवेश यादी पडताळणीसाठी संस्थेच्या log in मध्ये राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने उपलब्ध करुन दिलेल्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांची यादीची Latest प्रिंट आऊट घेऊन ती पडताळणीसाठी सादर करावी.

२) प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर करतांना सक्षम प्राधिकरणाची (AICTE) यांचे मान्यतेचे पत्र, शासन निर्णय, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे अंतिम मान्यतेचे पत्र सबंधित विद्यापिठाचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चे सलग्नता प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्राची प्रत जोडण्यात यावी. तसेच विद्यमान संस्थेने प्रथम व थेट व्दितीय वर्षाकरीता आवश्यक असलेली अनामत ठेव रक्कम (F.D.) सादर करणे आवश्यक आहे.

३) संस्थेस नवीन संस्था/नवीन अभ्यासक्रम किंवा प्रवेश क्षमता बदलास मान्यता दिलेल्या शासन निर्णयाची प्रत आणि तद्नंतर संचालनालयाच्या अंतिम मान्यतेची प्रत इत्यादी कागदपत्रे जोडण्यात यावी.

४) नवीन संस्थांनी आवश्यक रकमेची नियत ठेव (FD) भरणा केली असल्याची प्रत जोडावी. भरली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर प्रवेश यादी पडताळणीची कार्यवाही करण्यात येईल. तसेच शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये ज्या संस्थांना थेट अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली तसेच फॉर्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया यांचेकडून प्रवेश क्षमता वाढ/घट यास परवानगी देण्यात आलेली आहे अशा संस्थांनी नोंदणी शुल्क घेण्यात आले किंवा नाही याची पडताळणी करण्याकरीता नोंदणी शुल्क भरल्याची प्रत जोडावी.

५) संस्थास्तरावरील आणि केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर शिल्लक राहिलेल्या जागांवरील (ACAP) प्रवेशाकरिता संबंधित संस्थेने संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली जाहिरात, अर्ज मागविण्यासाठी कालावधी, प्राप्त अर्जांची गुणवत्ता यादी, प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुणवत्तेनुसार प्रवेश केले आहेत याबाबत आवश्यक कागदपत्रे सादर करावी.

६) अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करताना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबंधित सर्व कागदपत्रांची संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी / संस्थाप्रमुखांनी आवश्यक ते पडताळणी केलेली असल्याचे संस्थाप्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र पडताळणी वेळी सादर करावी.

७) सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेश याद्या पडताळणी करतांना प्रवेशित उमेदवारांची संबंधीत अभ्यासक्रमनिहाय शैक्षणिक अर्हतेची विशेषत्वाने पडताळणी करणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने दिनांक ८/१०/२०२० असाधारण राजपत्र क्रमांक २३५, दिनांक २०/८/२०२१ असाधारण राजपत्र क्रमांक २३९ व दिनांक ३/८/२०२२ असाधारण राजपत्र क्रमांक २७३ अन्वये प्रसिध्द केलेली अर्हता तसेच पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या माहितीपुस्तिकेमध्ये नमूद केलेली अर्हता केवळ ग्राहय धरता येईल.

८) शुल्क परताव्याबाबत आणि मूळ कागदपत्रे परताव्याबाबत संबंधित संस्थेबदल काही तक्रार असल्यास त्याबाबत चौकशी करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा तसेच शुल्क परतावा व मुळ कागदपत्रे परताव्याबाबत संस्थेकडे कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह सादर करावे.

**९) अल्पसंख्यांक दर्जाच्या बाबतीत त्यांना अल्पसंख्यांक विभागाने प्रदान केलेल्या शासन निर्णय क्र.अविवि-२०१०/प्र.क.१०९/१०/कार्या-५,दिनांक -०१ जुलै २०१३ नुसार, अल्पसंख्याक दर्जाच्या प्रमाणपत्राची व त्याचा वैद्य कालावधीची पडताळणी काटेकोरपणे करण्यात यावी.**

१०) महाराष्ट्र विना-अनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ दिनांक १७/८/२०१५ अस्तित्वात आला असून त्यामध्ये उशिरा प्रवेश / प्रवेशित उमेदवारांची माहिती उशिरा अपलोड करणे, मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणे अशी प्रकरणे नियमित करण्याची तरतूद नाही, ही बाब विचारात घेता विहीत मुदतीनंतर केलेले किंवा राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर उशिरा अपलोड केलेले प्रवेश आणि मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त केलेले प्रवेश कोणत्याही सबबीवर मान्य करण्यात येणार नाही.

११) प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे प्रवेश यादी विहीत दिनांकापर्यंत सादर करणे बंधनकारक आहे, याची नोंद घ्यावी.

१२) मागासवर्गीय उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी पावती सादर करुन प्रवेश देण्यात आलेले होते. सदर प्रकरणी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रक तपासणी अधिकारी यांचे निदर्शनास आणावे.

१३) सर्व अभियांत्रिकी पदवी तसेच एम ई पदव्युत्तर पदवी / वास्तुशास्त्र पदवी तसेच एमबीए/एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाचे या कार्यालयाव्दारे केंद्रीभूत प्रवेशासाठी (CAP) अद्ययावत केलेल्या माहीतीची प्रत सादर करावी व त्याप्रमाणे Cap, Against Cap व Institue level करीता प्रवेशक्षमता ग्राहय धरावी. त्यामुळे गुणवत्ता यादी तपासणीसाठी सादर करतांना या कार्यालयाव्दारे मंजुर केलेली प्रत गुणवत्ता यादीसोबत सादर करावी.

१४) ज्या विद्यार्थ्यांनी पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम सत्राचा निकाल जाहीर होण्याचे अधिन राहुन (Appearing) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेले आहेत अश्या विद्यार्थ्यांचे गुणांची टक्केवारी गुणवत्ता यादीत नमुद करावी

१५) एखाद्या विशिष्ट प्रकरणी मा. सर्वोच्च वा मा. उच्च न्यायालयाने काही निर्देश दिले असल्यास त्यानुसार सदर प्रकरणीचे कागदपत्रे निदर्शनास आणावे.

१६) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे AISHE चे प्रमाणपत्र सादर करावे.

१७) एनएसपी पोर्टलवर प्राचार्य व इन्स्टिटयुट नोडल ऑफीसर यांचे KYC केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

१८) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या मूळ प्रती (टि.सी. वगळता) विद्यार्थ्यांना नियमानुसार परत केल्याचे प्राचार्यांचे प्रमाणपत्र व त्याबाबतचा विद्यार्थ्यांच्या स्वाक्षरीसह अहवाल.

१९) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेल्या शुल्काची विद्यार्थीनिहाय एकत्रित यादी (प्राचार्यांनी प्रमाणित केलेली प्रत )

**सोबत :- वेळापत्रकाची प्रत,प्रपत्र**

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

COURSE - MBA

| Sr.No. | DTE code | Institute Name | Program Name | Date |
|---|---|---|---|---|
| 1 | **1005** | Department of Computer Science, SGB Amravati University, Amravati | MBA | 8/10/2026 |
| 2 | **1102** | Vidya Bharati Mahavidyalaya Department of Research and PG Studies in Science & Management, Amravati | MBA | 8/10/2026 |
| 3 | **1105** | Prof. Ram Meghe Institute of Technology & Research, Amravati | MBA | 8/10/2026 |
| 4 | **1107** | P. R. Pote (Patil) Education & Welfare Trust's Group of Institution(Integrated Campus), Amravati | MBA | 8/10/2026 |
| 5 | **1114** | Sipna Shikshan Prasarak Mandal College of Engineering & Technology, Amravati | MBA | 9/10/2026 |
| 6 | **1121** | Shri Hanuman Vyayam Prasarak Mandals College of Engineering & Technology, Amravati | MBA | 9/10/2026 |
| 7 | **1106** | Hari Kishan Jaju Education Sanstha's,College of Management & Computer Science, Yavatmal | MBA | 9/10/2026 |
| 8 | **1101** | Shri Sant Gajanan Maharaj College of Engineering,Shegaon | MBA | 8/10/2026 |
| 9 | **1116** | Shri Shivaji Education Society's College of Engineering and Technology, Akola | MBA | 9/10/2026 |
| 10 | **1123** | Dr. Rajendra Gode Institute of Technology &Research Amravati | MBA | 12/10/2026 |
| 11 | **1125** | Dwarka Bahu Uddeshiya Gramin Vikas Foundation, Rajarshri Shahu College of Engineering, Buldhana | MBA | 12/10/2026 |
| 12 | **1128** | Vidarbha Youth Welfare Society's, Prof Ram Meghe College of Engineering and Management, Badnera | MBA | 12/10/2026 |
| 13 | **1130** | Vision Buldhana Educational & Welfare Society's Pankaj Laddhad Institute of Technology & Management Studies, Yelgaon | MBA | 12/10/2026 |
| 14 | **1302** | Sushila Suryawanshi Management Institute of Technology Advancement Amravati | MBA | 12/10/2026 |

COURSE-MCA

## Course-MCA

| Sr. No. | DTE code | Institute Name | Program Name | Date | Name |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **1005** | Department of Computer Science, SGB Amravati University, Amravati | MCA | 8/10/2026 | Shri. P.R.Pachghare |
| 2 | **1102** | Vidya Bharati Mahavidyalaya Department of Research and PG Studies in Science & Management, Amravati | MCA | 8/10/2026 | Shri. S.M.Lawankar |
| 3 | **1105** | Prof. Ram Meghe Institute of Technology & Research, Amravati | MCA | 8/10/2026 | Shri.D.V.Rojatkar |
| 4 | **1107** | P. R. Pote (Patil) Education & Welfare Trust's Group of Institution(Integrated Campus), Amravati | MCA | 8/10/2026 | Shri.K.S.Vasankar |
| 5 | **1111** | Shree Hanuman Vyayam Prasark Mandal's P.G. Department of Computer Science & Technology, Amravati | MCA | 9/10/2026 | Shrimati.V.V.Ardhapurkar |
| 6 | **1113** | Sadhana Shikshan Mandal, Saraswati College, Shegaon | MCA | 9/10/2026 | Shri.R.S.Mawale |
| 7 | **1123** | Dr.Rajendra Gode Institute of Technology & Research,Amravati | MCA | 12/10/2026 | Shri.R.S.Mohod |
| 8 | **1314** | SMT Radhadevi Goenka College for women, Akola | MCA | 12/10/2026 | Shri.V.N.Ghate |

COURSE - ARCH./B.E./BTech.

| Sr.No. | DTE code | Institute Name | Program Name | Date |
|---|---|---|---|---|
| 1 | **1298** | Sipna School of Planning and Architecture, Amravati | Architecture | 9/10/2026 |
| 2 | **1289** | P.R. Patil College of Architecture, Amravati | Architecture | 8/10/2026 |
| 3 | **1116** | Shri Shivaji Education Society's College of Engineering and Technology, Akola | Architecture | 9/10/2026 |
| 5 | **1002** | Government College of Engineering, Amravati | B.E/B.Tech | 16/10/2026 |
| 6 | **1005** | Department of Computer Science, SGB Amravati University, Amravati | B.E/B.Tech | 16/10/2026 |
| 7 | **1105** | Prof. Ram Meghe Institute of Technology & Research, Amravati | B.E/B.Tech | 13/10/2026 To 14/10/2026 |
| 8 | **1107** | P.R.Pote Patil College of Engineering & Management, Amravati | B.E/B.Tech | 13/10/2026 To 14/10/2026 |
| 9 | **1114** | Sipna Shikshan Prasarak Mandal College of Engineering & Technology, Amravati | B.E/B.Tech | 16/10/2026 |
| 10 | **1121** | Shri Hanuman Vyayam Prasarak Mandals College of Engineering & Technology, Amravati | B.E/B.Tech | 16/10/2026 |
| 11 | **1123** | Dr. Rajendra Gode Institute of Technology &Research Amravati | B.E/B.Tech | 19/10/2026 |
| 12 | **1126** | Shri. Dadasaheb Gawai Charitable Trust's Dr. Smt. Kamaltai Gawai Institute of Engineering & Technology, Darapur, Amravati | B.E/B.Tech | 19/10/2026 |
| 13 | **1128** | Vidarbha Youth Welfare Society's, Prof Ram Meghe College of Engineering and Management, Badnera | B.E/B.Tech | 13/10/2026 To 14/10/2026 |
|  | **1347** | Late. Dr. D.B.Dod College of Engineering paratwada | B.E/B.Tech | 19/10/2026 |
| 16 | **1116** | Shri Shivaji Education Society's College of Engineering and Technology, Akola | B.E/B.Tech | 14/10/2026 |
| 17 | **1276** | Mavav School of Engineering & Technology, Gut No. 1035 Nagpur Surat Highway, NH No. 6 Tal.Vyala, Balapur, Akola, 444302 | B.E/B.Tech | |
| 18 | **1101** | Shri Sant Gajanan Maharaj College of Engineering,Shegaon | B.E/B.Tech | 21/10/2026 |
| 20 | **1119** | Paramhansa Ramkrishna Maunibaba Shikshan Santha's , Anuradha Engineering College, Chikhali | B.E/B.Tech | |
| 21 | **1125** | Dwarka Bahu Uddeshiya Gramin Vikas Foundation, Rajarshri Shahu College of Engineering, Buldhana | B.E/B.Tech | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 22 | **1130** | Vision Buldhana Educational & Welfare Society's Pankaj Laddhad Institute of Technology & Management Studies, Yelgaon | B.E/B.Tech | |
| 23 | **1182** | Padmashri Dr. V.B. Kolte College of Engineering, Malkapur, Buldhana | B.E/B.Tech | 22/10/2026 |
| 24 | **1265** | Mauli Group of Institutions, College of Engineering and Technology, Shegaon. | B.E/B.Tech | |
| 25 | **1268** | Siddhivinayak Technical Campus, School of Engineering & Research Technology, Shirasgon, Nile | B.E/B.Tech | |
| 26 | **1180** | Sanmati Engineering College, Sawargaon Barde, Washim | B.E/B.Tech | 22/10/2026 |
| 27 | **1012** | Government College of Engineering, Yavatmal | B.E/B.Tech | 23/10/2026 |
| | **1117** | Babasaheb Naik College of Engineering Pusad | B.E/B.Tech | |
| 28 | **1120** | Jawaharlal Darda Institute of Engineering and Technology, Yavatmal | B.E/B.Tech | |
| 29 | **1127** | Jagadambha Bahuuddeshiya Gramin Vikas Sanstha's Jagdambha College of Engineering and Technology, Yavatmal | B.E/B.Tech | |

## प्रमाणपत्र

विषय : शैक्षणिक वर्ष २०२६ -२७ विद्यार्थ्यांकडून आकारण्यात आलेले शुल्क एकत्रित यादी चे प्रमाणपत्र.

प्रमाणित करण्यात येते की, **शैक्षणिक वर्ष २०२६-२७** मध्ये संस्थेतील विद्यार्थ्यांकडून आकारण्यात आलेले शुल्क विद्यार्थीनिहाय वसूल करण्यात आले असून, त्याची **विद्यार्थीनिहाय एकत्रित यादी** तयार करण्यात आलेली आहे.

सदर यादीतील नोंदी महाविद्यालयाच्या उपलब्ध अभिलेखांनुसार योग्य व सत्य असून, वसूल केलेल्या शुल्काची रक्कम संबंधित नोंदवही/पावतीनुसार जमा करण्यात आलेली आहे.

हे प्रमाणपत्र कार्यालयीन नोंद व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी देण्यात येत आहे.

स्थळ : __________
दिनांक : __________

| **अ.क्र.** | **विद्यार्थ्यांचे नाव** | **Application ID** | **वर्ग/सत्र** | **एकूण शुल्क** | **भरलेली रक्कम** | **दिनांक** | **पावती क्रमांक** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

ठिकाण : __________
दिनांक : __________

प्राचार्य
स्वाक्षरी : __________
नाव : __________
संस्थेचे नाव : __________
संस्थेचा शिक्का

## प्रमाणपत्र

विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ विद्यार्थ्यांचे मूळ प्रमाणपत्र (TC वगळता )नियमानुसार परत केल्याबाबत प्रमाणपत्र.

प्रमाणित करण्यात येते की, ________________ या संस्थेतील विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शैक्षणिक पात्रतेशी संबंधित आवश्यक मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे पडताळणीसाठी स्वीकारण्यात आली होती.

सदर मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रांची आवश्यक पडताळणी पूर्ण केल्यानंतर ती संबंधित विद्यार्थ्यांना नियमानुसार परत करण्यात आलेली आहेत. मूळ प्रमाणपत्रे परत मिळाल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या खालील नोंदवहीमध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

विद्यार्थ्यांची स्वाक्षरी नोंद

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | Application ID | वर्ग/सत्र | विद्यार्थ्यांची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

वरील नोंदीनुसार विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे संबंधित विद्यार्थ्यांना परत करण्यात आलेली असून, त्याबाबत विद्यार्थ्यांकडून स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. संस्थेकडे विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे अनावश्यकपणे प्रलंबित नाहीत.

ठिकाण : __________
दिनांक : __________

प्राचार्य
स्वाक्षरी : ___________
नाव : ______________
संस्थेचे नाव : __________
संस्थेचा शिक्का